
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ११५५३




१९६५
REFBK-0014821
REFBK-0014821

८८०५
८३९८६
६।३।८७

१९८३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ८३९८६ वि: काव्य
क्रमांक १९८३ नों दि. ६।३।८७।

# एकतारी

REFBK-0014821
REFBK-0014821
स. क. 58129

# शिरीष पै यांचे साहित्य

चैत्रपालवी

हेही दिवस जातील

सुखस्वप्न

मयूरपंख

कस्तुरी

आंतला आवाज

मंगळसूत्र

कांचनबहार

खडकचांफा

लालन बैरागीण

हापूसचे आंबे

आईचीं गाणीं

# एकतारी

## शिरीष पै

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

चार

© शिरीष पै

पहिली आवृत्ती १९६५, १८८७

मुद्रक : बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार
मुंबई २ BR

प्रकाशक : गणेश रामराव भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ३४ WB

# अनुक्रमणिका


१ तोडतां तुटेना ११

२ जडलें मन... १२

३ इतुक्या दिवसांचा १३

४ जीव गेला तरी १४

५ काय होतें... १५

६ प्रेम खरें... १६

७ होईल तितुकें १७

८ हळु हळु खालीं १८

९ आला आला रे... १९

१० कळे अपराध २०

११ घातलीसे नाथा २१

१२ मुठींतली वाळू २२

१३ माझ्या उरीं... २३

१४ तुझीयावाचून २४

१५ वळताच... २५

१६ आता तरी सोड २६

१७ माझ्याहून खरें २७

१८ आलें होतें तेव्हां २८

१९ सारी सारी तेढ २९

२० कधींमधीं हातीं ३०

२१ तरंगतो दूर ३१

२२ कैसा मी... ३२

२३ कितीदां पाहीली ३३

२४ तुझ्याहून वाटे ३४

सहा

२५ अधून मधून ३५
२६ आजच्या हवेचा ३६
२७ माझ्याच मनाचा ३७
२८ मिटते मिटवीते ३८
२९ एकामागे एक ३९
३० इतुकी सन्निध ४०
३१ जाणते कीं... ४१
३२ माझ्या मागणीला ४२
३३ ऐशी जाताना... ४३
३४ तुझ्यावरी माझा ४४
३५ माझ्या दिव्यावरी ४५
३६ पायाखालीं वाळू ४६
३७ तुला काळजांत ४७
३८ कधीं न वेदना ४८
३९ तूं न लावीला ४९
४० इतुकें इतुकें ५०
४१ नाहीं भिडवीला ५१
४२ भिजेन भिजेन ५२
४३ आजचा दिवस ५३
४४ आपुलीया बळे ५४
४५ तूच लोटलेस ५५
४६ उधळूनी पट ५६
४७ उभ्या रात्रीचें... ५७
४८ नको बैसवूस ५८
४९ भिजल्या रात्रीची ५९
५० राहून राहून ६०

५१ लाटेवरी लाट ६१
५२ वारंवार येते ६२
५३ कोठला विषय ६३
५४ गळायची तरी ६४
५५ तूच शिकविलें ६५
५६ येती तैसे जाती ६६
५७ दिलेलें वचन ६७
५८ कितीक शब्दांचें ६८
५९ आज आटतांना ६९
६० अशी संध्याकाळ ७०
६१ चालून चालून ७१
६२ उडालें पांखरू ७२
६३ कशानें कशानें ७३
६४ तुला आठवता ७४
६५ कैसा गाजवावा... ७५
६६ आजचा बहर ७६
६७ माझी फुलवेडी वेल ७७
६८ वीजेचीच वाट ७८
६९ शेवटचें मूल ७९
७० कासया केलीस... ८०
७१ तुझे सत्त्व सारें ८१
७२ आज माझ्या ओंजळींत ८३
७३ रडून मोकळा ८४
७४ गळे हातांतून ८५
७५ यावयाच्या पूर्वीं ८६
७६ अशी ओसंडते ८७
७७ नको समजूं कीं ८८

नऊ

विठोबावाचून
उचंबळे जीव
तुकोबाचा भाव
ऐसा थोर

अभंग वैखरी
धन्य तुकयाची
आणि मी फुकाची
प्रेम गाई

# १. तोडतां तुटेना

तोडतां तुटेना
तुझा मोहपाश
जरी सर्वनाश
त्या कारणें

कळे सर्वनाश
तरी पाय ओढी
आणिकाची गोडी
उरली न

जळतसे वात
न जळे पणती
परी माझी माती
आत्म्यासवे

लागो ऐशी आग
तनुमनांतून
यावया फुलून
गीत तुझें

परंतु प्रार्थना
तुझें माझें प्रेम
होऊनीया नेम
नासूं नये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १८८२९

# २. जडलें मन...

जडलें मन तुझ्यावरी
हाहाकार माझ्या घरीं

तुझें सारें विपरीत
मला धाडीशी अनर्थ

काढीता तूं आठवण
मला वादळें...तूफान...

तुझी पेटलेली धूळ
माझें फोफावतें खूळ

होवो व्हावा तितुका नाश
नाहीं अजुन निराश

तुझा घाव तीळ तीळ
माझें गाणें उजळील

# ३. इतुक्या दिवसांचा

इतुक्या दिवसांचा
कोंडलेला राग

इतुक्या दिवसांची
धुमसते आग

इतुक्या दिवसांचा
साठलेला हट्ट

इतुक्या दिवसांचें
डोळ्यांतलें मीठ

इतुक्या दिवसांचे
उरांत उमाळे

इतुक्या दिवसांचे
भेटीचे डोहाळे

इतुक्या दिवसांचा
भरला कलश

तडाड फोडून
किती सांडूं रस

...भेटत्या क्षणास

# ४. जीव गेला तरी

जीव गेला तरी
प्राण देऊं नये
आणि प्राणांसवे
मीलनाशा

गळे पान पान
जरी तुटे देठ
परंतु ती भेट
न टळावी

ऐसे जी घडावें
एकदां मीलन
मिठीमध्यें प्राण
मावळेल

तेव्हां प्राणासवे
जा घेऊन खूळ
ना तरी हा छळ
संपे कैचा

# ५. काय होतें ....

काय होतें माझें ऋण
देसी शब्द पाठवून

अजूनी का होते सय
नातरी कोठूनी लय

किती ओढसी कुशींत
वाढे सारखें हें गीत

माझ्यापायीं तुझे हाल
म्हणूनी का लागे चाल

# ६. प्रेम खरें...

प्रेम खरें, प्रेम खोटें
असें वाटे, तसें वाटे

या वाटण्यातटण्यांत
घडे मात्र ताटातूट

नको शंका, नको भय
तुझ्यापाशी मी निर्भय

स्वीकारीलें तुझें धाम
घडो कांहीं परिणाम

# ७. होईल तितुकें. . .

होईल तितुकें
प्रेम मी करीन
जोवरी हा जन्म
ओढतसे

पुरें झिजवीन
जरी न चंदन
सुगंधावाचोन
जळे तरी

पुरें आता सोंग
काय न ठाऊक
फक्त तुझी भीक
मागीतली

मात्र माझा भार
न होवो तुजलागी
ना तरी अभागी
दूर बरी

तेही न वाऊगें
ऐशी मी दुभंग
तुझाच अभंग
जोपासीन

## ८. हळु हळु खालीं

हळु हळु खालीं
उतरतें ऊन
चालली टळून
संध्याकाळ

डुंबाया लागलें
बिंब जळावर
तांबडें काहूर
आकाशांत

आणि त्यामागून
जांभळा अंधार
पुसतो आकार
एक एक

जावें परतून
स्फुंदतें मनांत
तीच पायवाट
झंकारली

जिवाशिवाहून
जीवाशीं जीवाची
भेट त्या क्षणाची
वर्णूं काय

# १. आला आला रे...

आला आला रे पाऊस
धो धो मातीशी झुंजत
ऊर ऊराशीं फाटला
अशी त्याची तिची भेट

कडेकोट कोसळले
वृक्ष चालले वाहत
पाचोळाही भोवंडला
फिरतांना भोवऱ्यांत

माझा फाटका पदर
मीही पुढें पसरीला
आतां फाटूं दे अवघा
झेलतांना पावसाला

# १०. कळे अपराध

कळे अपराध
केला मी एवढा
प्राणालाच वेढा
दिला तुझ्या

परंतु तो वेढा
माझ्याच प्राणांचा
तुझ्याहून त्यांचा
चक्काचूर

सांडलें अमृत
जिरलें मातींत
रिते माझे हात
आक्रोशती

आलें जुळवाया
पहिल्यापासून
घे रे सांभाळून
आतां तरी

# ११. घातलीसे नाथा

घातलीसे नाथा
शेवटची मिठी
दिठीमाजी दिठी
मेळवून

याच क्षणासाठीं
केला अट्टाहास
जरी हा आभास
पुसवेना

नको रे नाकारूं
शेवटचा क्षण
शेवटी कमान
कोसळतां

नाहीं मी येणार
झाली रुजवात
तुझ्या काळजांत
संपलें मी

१४८२९

# १२. मुठींतली वाळू

मुठींतली वाळू
चालली गळून
मीही तुझ्यांतून
आज दूर

सारखी भरून
शिणलें मी फार
उतरते भार
भावनांचा

ज्यानें दिलें प्रेम
त्यानें औदासिन्य
कधीं कधीं शून्य
नेमधर्म

# १३. माझ्या उरीं...

माझ्या उरीं तुझा वार
वीष भिनलें आरपार

मूर्त तुझी...माझे डोळे...
नख झालें निळें काळें

तुझा शब्द...माझे कान...
रक्त चाललें गोठून

तुझी पडता सावली
काया पूर्ण करपली

तुझी फिरली लहर
तेव्हां कळालें जहर

मी तो काळोखाचा प्याला
तया विषलाभ झाला

# १४. तुझीयावाचून

तुझीयावाचून
'तूं' शीं संवादीते
लटीक्या वादातें
घोळवून

ऐशा दिवसाला
चढे तुझा रंग
तुझ्यांत मी दंग
सांगोपांग

असो तुझी माया
तेंही एक सत्य
भाविकाचें रक्त
पाझरतें

## १५. वळताच...

वळताच तुझी पाठ
पुन्हा बुडालें दुःखांत

मघा दावीलें हसून
पुरा गेलास फसून

तसा तूही बेगुमान
असा माझा अभिमान

तुवा मांडीली लढाई
मला हारण्याची घाई

तूची मोजून घे माप
दमशील आपोआप

अरे दावीन दावीन
बळ माझेंही हरून

७३९८६ काव्य
१९७३ ६/३/७९

# १६. आता तरी सोड

आता तरी सोड
बांधलेले हात
कोंडला गळ्यांत
प्राणसूर

उसळून दूर
जरी मी जाईन
तुझ्याच येईन
पिंजऱ्यांत

# १७. माझ्याहून खरें

माझ्याहून खरें
उत्कट आकाश
शेवटी प्रकाश
पांगतांना

माझ्याहून खरा
मेघांचा अभंग
मावळते रंग
सांडताना

माझ्याहून खरें
माझ्यांतलें कोणी
जातें उसासुनी
पाहतांना

नाहींच का माझें
तांबडें तूफान
येणार दाटून
संपतांना

# १८. आलें होतें तेव्हां

आलें होतें तेव्हां
भरून आभाळ
तसें तुझें भाळ
उत्कंठित

' आज तुझ्यासाठीं
आलों मी दाटून '
इतुकें बोलून
थांबलास

कितीतरी आज
दाटलें आभाळ
परी तुझें भाळ
निरक्षर

# १९. सारी सारी तेढ

सारी सारी तेढ
गेली मावळून
पुन्हां मनांतून
चंद्रबिंब

पुन्हां भरतांना
लाटेवरी लाट
तेव्हांहून कांठ
ओलाचिंब

## २०. कधीमधीं हातीं

कधीमधीं हातीं
एवढा उपाय
फक्त तुझें भय
पांघरावें

नको समजूं कीं
तुझ्यावरी राग
मी तो माझा भोग
स्वीकारीला

# २१. तरंगतो दूर

तरंगतो दूर
एकला पडाव
सोडूनीया ठाव
आला कोठें

कीं हें माझें मन
तेंही माझ्यांतून
मलाच सोडून
हेलावतें

## २२. कैसा मी ...

कैसा मी तोडावा
शेवटचा पाश
याहून निराश
होऊं कैसी

तटातट बंध
तोडीले परंतु
शेवटला तंतु
न तोडवे

# २३. कितीदां पाहीली

कितीदां पाहीली
दिवसां मी लाट
चांदण्यांत थाट
वेगळाची

पाण्याहूनी पाणी
ओलें चांदण्यांत
तुझ्यासवें चित्त
तैसें माझें

# २४. तुझ्याहून वाटे

तुझ्याहून वाटे
गोड हा एकांत
सारखी तुझ्यांत
तरंगते

तुझ्याहून तुझी
असते स्वप्नांत
जैसी का मिठींत
काळजाच्या

तुझ्याहून गोड
तुझेंच चिंतन
माझे पंचप्राण
व्याकूळता

तुझ्याहून खरा
तुझाच आभास
तरी तूं हवास
माझ्या जीवा

# २५. अधून मधून

अधून मधून
सारीते ही वात
प्राणाच्या तेलांत
पेटलेली

अधूनमधून
सोडवीते प्राण
पडला गहाण
ज्या प्राणांत

नको नको झाला
माझा जीव मला
जसा तुझा तुला
माझ्यावीण

# २६. आजच्या हवेचा

आजच्या हवेचा
गुण वेगळाच
जसा तुझा जाच
माझ्या मना

मेघांच्या मुठींत
कोंडलें आभाळ
जसें सर्वकाळ
कीं तूं मला

इथें तिथें राख
ठेवीली फासून
तुझ्यापरी ऊन
दूर गेलें

# २७. माझ्याच मनाचा

माझ्याच मनाचा
चालला हा खेळ
ज्याचा ताळमेळ
जाणे मीच

तुला ऐकवीतां
फक्त हासशील
काय सोसशील
माझ्यापरी

# २८. मिटते मिटवीते

मिटते मिटवीते
अनंत पाकळ्या
पुन्हां पुन्हां कळया
बहरती

आतां मावळणें
राहील न हातीं
फुलण्याची सक्ती
जन्मभर

# २९. एकामागे एक

एकामागे एक
लागलेत दिवे
पांगतात थवे
पाखरांचे

कुणाचें पाऊल
वाजतें म्हणून
जातसे मिटून
पान पान

कुणी कोंडला कीं
उरांतून श्वास
कुणाचा हा भास
काळोखांत

किती लांबवीला
हात अंधारांत
तरी त्याचें बोट
न सापडे

# ३०. इतुकी सन्निध

इतुकी सन्निध
आलें तुझ्या तेव्हां
कळला विसावा
कोठें आहे

कोठें गुंतलें हें
कळे मला मूळ
माझें फूलफूल
तुझ्यांतून

तूं मात्र जाणून
फिरवीशी पाठ
ऊर काठोकाठ
तुडुंबता

तुझ्याहून तुझी
सजा मी भोगते
भरताच रितें
माप तुझें

# ३१. जाणते कीं....

जाणते की तुझी
यातना महान
जाणते लहान
दुःख माझें

जाणते कोंडिली
आग तूं उरांत
माझ्या ठिणगींत
वन्ही सान

तरी पसरीते
ओंजळ भाविक
याचीते कौतुक
पायी तुझ्या

# ३२. माझ्या मागणीला

माझ्या मागणीला
नाहींच शेवट
असा माझा हट्ट
आक्रस्ताळी

तुझ्या उदाराचा
घेऊन फायदा
मी माझा वायदा
जुळवीला

तुझ्याचपासून
मागते शासन
हात हातांतून
सोडूं नको

# ३३. ऐशी जातांना...

ऐशी जातांना वाहत
धागा धागा पकडीते
क्षणासाठीं जोडीलेलें
नातें क्षणांत तोडीते

इथें, तिथें, नाहीं कुठें
पाय नाहींच ठरत
फक्त पुढें वाहण्याचा
ज्वर चालला मुरत

# ३४. तुझ्यावरी माझा

तुझ्यावरी माझा
न व्हावा अन्याय
रात्रंदिन भय
जाळीतसे

म्हणूनीच पाय
रोखला दारांत
येथून हालत
नाहीं आतां

# ३५. माझ्या दिव्यावरी

माझ्या दिव्यावरी
होऊनी पतंग
जाळीतसे अंग
दूर कोणी

माझ्या दिव्यावरी
पेटवूनी वात
तेवतसे शांत
दूर कोणी

# ३६. पायाखालीं वाळू

पायाखालीं वाळू
जाता तुडवीत
ढासळलें चित्त
कण कण

ओहोटीच्या पार
लावीता मी ध्यान
अचानक ऊन
मावळलें

जशी भडकात्री
काळजांत आग
तैसा रंग राग
चोहीकडे

अपुऱ्या डोळ्यांत
न:मावे सोहळा
पाहीजे फाडला
ऊर आतां

# ३७. तुला काळजांत

तुला काळजांत
ठेवीलें कोंडून
घेतलें ओढून
दार दार

शब्दही न जरा
दिला निसटाया
अशी कांहीं माया
पांघरली

कुठवर रोधूं
भावनेचा पूर
तुझ्यांत काहूर
हें जाणून

# ३८. कधीं न वेदना

कधीं न वेदना
तुझी समजावी
अशा तुझ्या गावीं
पोचलें मी

एकीमाजी दुजी
गुरफटे वाट
तुझ्या जंगलांत
गुंतलें मी

याहून याहून
अडकावे पाय
तुझाच उपाय
लाभे तरी

# ३९. तूं न लावीला

तूं न लावीला तरीही
तुझा लागला रे लळा
किती वाढल्या या कळा

तूं न दिलास परंतु
तुझा पोचला प्रकाश
पुरे तितुकाही भास

तूं न पेरीलेस परी
आलें पानाआधीं फूल
पडे माझी मला भूल

# ४०. इतुकें इतुकें

इतुकें इतुकें
जडवीलें प्रेम
कोठलाच नेम
न पाळला

याहून पडावी
भर यातनेंत
ऐसा माझा हेत
न राजसा

जरी दुखावलें
न दुःख देईन
केवळ जपेन
भाव तुझा

# ४१. नाहीं भिडवीला

नाहीं भिडवीला
डोळ्यालागी डोळा
कारण या कळा
कापतात

इतुक्या दुरून
होतो थरकाप
मला माझें पाप
भेडसावी

84129
1963 काव्य

# ४२. भिजेन भिजेन

भिजेन भिजेन
सारी सारी रात
उभी पावसांत
नाहतांना

माझ्या मातींतून
उसळूं दे गंध
चौफेर आनंद
कोसळतो

कधीं न पाहीला
ऐसा गा वर्षाव
तुझा माझा गाव
पाण्याखालीं

# ४३. आजचा दिवस

आजचा दिवस
साजरा करीन
पोचलें फिरून
गांवीं माझ्या

माझ्या वाटेवर
वळलें मी पुन्हां
पूर्वींच्याच खुणा
आठवीत

कितीक शोधाया
घेतले वळसे
पावलांचे ठसे
अखंडित

आता तरी कृपा
ठेवशील काय
अडकला जीव
याच ठायीं

# ४४. आपुलीया बळे

आपुलीया बळे
बोलते मी आतां
नाहीं माझ्या चित्ता
राहवत

ला जिवलगा
पुरती शरण
सुखाचें कारण
तूंच एक

नको नको करूं
याहून व्याकुळ
तूच माझें खूळ
सांभाळीं गा

# ४५. तूच लोटलेस

तूच लोटलेस
या मला खाईंत
तूच तुझा हात
सोडलास

तूच ढकलूनी
दावीलीस पाठ
तूं माझें ललाट
डागलेस

किती अंधारांत
चाललें मी खोल
लावीन हा बोल
फक्त तुला

# ४६. उधळूनी पट

उधळूनी पट
पाहता मागुती
आठवणी किती
कोसळती

ही कीं ती धरावी
दाबून उराशीं
आलेत कंठाशीं
प्राण माझे

नाहीं संपणार
पिसाट हा खेळ
त्यांतून ही वेळ
पावसाची

# ४७. उभ्या रात्रीचें....

उभ्या रात्रीचें जागरण
त्यांत भर टाकण्यास
आला पहाटे पाऊस

किती अकाळ विकाळ
मेघ दाटले नभांत
जसा तूं माझ्या मनांत

झुंजझुंजून वाऱ्याशीं
गेल्या पाकळ्या गळून
आणि मीही माझ्यांतून

# ४८. नको बैसवूस

नको बैसवूस
मला देवपदीं
ना तरी उपाधी
तापवील

म्हणून सांगते
पहिल्यापासून
पायींची वहाण
पायीं ठेव

# ४९. भिजल्या रात्रीची

भिजल्या रात्रीची
घालीते मी आण
देहांतला प्राण
नाहीं माझा

तुझ्यापाशीं ठेव
ठेवली केव्हांच
केवळ तेथेंच
सुरक्षित

# ५०. राहून राहून

राहून राहून
कोसळे पाऊस
नको रे पाहूस
अंत माझा

काळ्या मेघांमाजी
मिसळे काळोख
वादळाची भूक
वाढणारी

बैसलें घालून
मिठी मजबूत
पावसाचें भूत
मानेवरी

# ५१. लाटेवरी लाट

लाटेवरी लाट
लागली भराया
असा किती वाया
गेला पूर

सांडून सांडून
नासलें कितीक
उरलास एक
तूं केवळ

तुलाच जोडून
साठवीते बळ
मला माझी कळ
गोड झाली

# ५२. वारंवार येते

वारंवार येते
दाटून मनांत
आता मी जनांत
राहूं कैसी

धावूं तरी कुठें
घेऊन आकांत
आज नाहीं शांत
राहवत

तुझ्यावीण माझें
वाटे मला भय
नको तेथें पाय
ओढतात

# ५३. कोठला विषय

कोठला विषय
न मी जाणे त्यास
माझ्या भावनेस
पुरतसे

कोठेंतरी थेट
जायचें वाहत
एवढीच रीत
अभ्यासली

# ५४. गळायची तरी

गळायची तरी
गळोत हीं पानें
तुझ्या कारणें
ओसरेन

तुझी नसतांना
जितुकी सरेन
तितुकी भरेन
तुझ्यापाशीं

# ५५. तूच शिकविलें

तूंच शिकविल
व्हावया उदास
हसूं तरी त्रास
वाटे तोही

# ५६. येती तैसे जाती

येती तैसे जाती
दाटलेले ढग
आणि तगमग
त्यांच्यासवें

नाहीं का हा कधीं
थांबणार क्षण
ज्याच्यांतून प्राण
गुंतलेला

# ५७. दिलेलें वचन

दिलेलें वचन
पाळता न आलें
काळजांत सले
खंत हीच

दिलेली शपथ
मोडली समक्ष
याजलागी साक्ष
तूं केवळ

मोडतां तोडतां
आलें तुझ्यापाशी
तूच कासावीशी
थांबवी गा

# ५८. कितीक शब्दांचे

कितीक शब्दांचे
डोळारे बांधून
घेतलें झाकून
क्षुद्रपण

शेवटी हातांत
एवढेंच सत्य
जातीचेंच रक्त
बेईमान

# ५९. आज आटतांना

आज आटतांना
फिरून दाटलें
उसळेन काय
भयही वाटलें

कायम चालली
ऐशी यातायात
कधींच का प्राण
व्हायचा न शांत

# ६०. अशी संध्याकाळ

अशी संध्याकाळ
तुलाच वाहिली
तेव्हांच काहिली
झाली शांत

किती तातातूट
झाली आजवर
चुकला न भर
संध्याकाळीं

# ६१. चालून चालून....

चालून चालून
दुखले रे पाय
नकळे ही जाय
वाट कोठे

गेल्या अंधारून
दिशा या दहाही
केव्हां नेम नाहीं
कोसळेल

कुणास मारावी
हाक मी अशात
अचूक ओठांत
नांव तुझें

## ६२. उडालें पाखरू

उडालें पाखरू
गळें आकाशांत
पुन्हा पिंजऱ्यांत
येईल का

येईल . . . येतांना
विसरूनी पंख
उरेल ती राख
आयुष्याची

# ६३. कशानें कशानें

कशानें कशानें
लागेल समाधी
तेवढी उपाधी
दे धाडून

पुन्हां सोसतांना
पोचेन तेथेंच
जिथें तुझी ठेंच
लागलेली

# ६४. तुला आठवता

तुला आठवता
मला विसरेन
हेंची समाधान
लाभे त्यांत

नको माझी मला
जुनी आठवण
मागलें तूफान
सरेचिना

# ६५. कैसा गाजवावा . . .

कैसा गाजवावा हक्क
तुम्ही . . . तुम्हीच मालीक

घ्यावें जाणोनी हें मनीं
तुम्ही नशीबाचे धनी

सारी सोडली हो लाज
जेव्हां फाडीलें काळीज

आम्ही चुकत माकत
आलों तुमच्या दारांत

तुम्ही म्हणाल तो भाव
आज आमुचा लिलांव

# ६६. आजचा बहर

आजचा बहर
असो शेवटचा
कधीं न यायचा
परतून

आजची समाधी
ठरो प्राणांतिक
गाठतांना टोक
आयुष्याचें

सर्वस्व देऊन
झालें मी मोकळी
शेवटी साखळी
केली पूर्ण

# ६७. माझी फुलवेडी वेल

माझी फुलवेडी वेल
तिची फुलांची लहर
नेमानाचून बहर

तिची फुलण्याची खुशी
जेव्हां लागतसे कळ
पानापानामागे फूल

असा प्राणाचा बहर
रोज येईल कुठून
देठ जाईल तुटून

देठ तुटतांना तरी
डोळे यावेत भरून
वेड वेलीचें स्मरून

# ६८. वीजेचीच वाट

वीजेचीच वाट
वीजेचें पाऊल
वीजेची चाहूल
वीजेलाच

वीजेचीच हवा
वीजेचाच श्वास
वीजेलागीं भास
वीजेचाच

वीजेचेंच घर
दारही वीजेचें
वीज दारी नाचे
वीजेसाठीं

वीजेला पेरीले
वीजेच्या मळ्यांत
वीज झाली खत
वीजेखालीं

वीजेच्या वेलीला
वीजेचा बहरू
वीजेचें पाखरू
वीज वेची

# ६९. शेवटचें मूळ

शेवटचें मूळ
उपटीता उपटेना
मिठी मातीची सुटेना

घावावरी घाव
जीव तणाचा तुटेना
वाढ वाढता खुटेना

जाळीयलें रान
रस पानांत आटेना
कोंब कसाही कटेना

# ७०. कासया केलीस ...

कासया केलीस
दारें बंद सारी
तटबंदी वरी
बांधलीस

बाहेरी खंदक
खोदलेस खोल
पाहताची तोल
जाई माझा

बंदोबस्त सारा
केला कडकोट
अवघड वाट
ठेवलीस

तूच ना दिलेस
अनावर खूळ
आणिक ही कळ
काळजांत

ना तरी दे तूच
पंख प्राणासाठीं
राही सदा पाठीं
आकाशांत

# ७१. तुझे सत्त्व सारें

तुझें सत्त्व सारें
त्यांच्या पदरांत
माझीया हातांत
फोलपट

अमृताची धार
त्यांना डोईभर
माझ्या खांद्यावर
रक्तव्रण

सजवली त्यांचीं
सोंगें आवडीनें
पुसलीस पानें
माझ्या मुखां

त्यांच्या देवळाला
सोन्याचे कळस
दारची तुळस
न शिंपली

छाया त्यांच्यासाठीं
काय माझें पाप
अखंड हा शाप
पोळण्याचा

८२

त्यांच्यासाठी होसी
मत्त महापूर
कधी ना निर्झर
माझ्यास्तव

काय कमी केलें
रोष हा म्हणोनी
दिलें दवडोनी
वाळवंटीं

उपेक्षेचा भार
सोसवेना आतां
घेई प्राणनाथा
गाभाऱ्यांत

# ७२. आज माझ्या ओंजळींत

आज माझ्या ओंजळींत
दाणे घाल मूठभर
काय मागते मी फार

सोडूनीया भीडलाज
दार तुझें ठोठावलें
हात दोन्ही पसरीले

नाहीं तुला दयामाया
किती मागावी मी भीक
तुला यांतच का सुख

हात देणाऱ्या गा तुला
कधीं यायचें कळून
द्यावे मागीतल्यावीण

# ७३. रडून मोकळा

रडून मोकळा
करूं दे हा जीव
आसवांना वाव
लाभूं दे रे

कोंडून कोंडून
घेतलेला ताण
जाऊं दे फुटून
स्फुंदतांना

अश्रूंत साधली
तुझी जवळीक
रडण्याचें सुख
भोगतांना

# ७४. गळे हातांतून

गळे हातांतून
सुन्न कोरें पान
जसा मनांतून
देह गळे

गळाली लेखणी
उडाला कागद
जमलेले शब्द
त्यामागून

सारें दूर दूर
गेलें रे वाहून
तुज ओथंबून
पाहतांना

# ७५. यावयाच्या पूर्वीं

यावयाच्या पूर्वीं
पोचलास येथें
बोलण्याआधींच
बोलून मी घेते

इतुक्यानें झालें
एवढी व्याकुळ
समजलें केला
किती तुझा छळ

## ७६. अशी ओसंडते

अशी ओसंडते
गुण या जागेचा
नाहीं कसें म्हणूं
थोडाफार माझा

कसें समजावूं
किती तूं अजाण
तुझ्याच कारणें
आज मी बेभान

# ७७. नको समजूं कीं

नको समजूं कीं
रेताडलें आंत
येशील दाटून
पुन्हा काळजांत

मुळांतली वेल
पुन्हां पालवेल
यंदाचा बहर
वेगळा असेल

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 98129
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 63816 वि: काव्य
क्रमांक 9863 नों दि. 6/2/61
REFBK-0014821
REFBK-0014821